विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागांच्या केंद्र व राज्य पुरस्कृत शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क इ. योजनांच्या प्रलंबित देयकांच्या ६० टक्क्याच्या मर्यादेत निधी संबंधित शैक्षणिक संस्थांना तदर्थ अनुदान म्हणून अदा करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग
व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग
शासन निर्णय क्रमांक : इबीसी-२०१७/प्र.क्र.७३/शिक्षण
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १५ डिसेंबर, २०१७

वाचा :१) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.टीईएम-२०१६/प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक १५.०४.२०१७

२) शासन अधिसूचना, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, क्र.इबीसी-२०१७/प्र.क्र.१२१/ शिक्षण, दिनांक ०६.०६.२०१७

३)शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेश सहाय्य विभाग, क्र.ईबीसी-२०१७/प्र.क्र.४०३/ शिक्षण-१, दिनांक ०७.०८.२०१७

४)शासननिर्णय, आदिवासी विकास विभाग,क्र. आविवि-२०१७/प्र.क्र.४०/का.१२, दिनांक १९.०८.२०१७

५) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्र. आधार-२०१६/प्र.क्र.१०८/एसडी-५, दिनांक १७.०९.२०१७

६) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेश सहाय्य विभाग, क्र.ईबीसी-२०१७/प्र.क्र.५२४/ शिक्षण-१, दिनांक ८.१२.२०१७

प्रस्तावना :

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून माहिती व तंत्रज्ञान संचालयाने विकसित केलेले महाडिबीटी पोर्टल वर काही विद्यार्थ्यांना अर्जाची नोंद करण्यास अडचणी येत आहेत. त्याचबरोबर महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांचे परिपूर्ण अर्ज शासकीय कार्यालयांकडे पाठविण्यास अडचणी येत असल्याने आणि सन २०१७-१८ च्या पहिल्या सत्रासाठी सदरहू पोर्टलचे पुर्णत: कार्यन्वयन होणे बाकी आहे.त्यामुळे विविध विभागांनी संदर्भीय शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क इ. योजनांच्या प्रदानांची रक्कम डिबीटी पोर्टलद्वारे विद्यार्थ्यांना उपलब्ध करण्यास काही अवधी लागणार असल्याची बाब निदर्शनास आणली आहे.

२. सद्य:स्थितीत, शिष्यवृत्ती, निर्वाह भत्ता, शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क इत्यांदीची देय रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा होत नसल्याने विद्यार्थ्यी महाविद्यालयात त्यांची फी भरू शकत नाही. परिणामी, शैक्षणिक संस्था, महाविद्यालयांना त्यांचे शैक्षणिक खर्च (शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर खर्च) भागविणे अवघड झालेले आहे. त्याचबरोबर, सन २०१०-११ ते सन २०१६-१७ या

कालावधीत माहे मार्च, २०१७ अखेरपर्यंत विशेष चौकशी पथकाने केलेल्या लेखापरीक्षणाच्या अनुषंगाने शिक्षणसंस्था व महाविद्यालयांची शिष्यवृत्ती, निर्वाह भत्ता,शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क इ. ची देय रक्कम मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्याने, त्याचा विपरीत परिणाम शैक्षणिक संस्था, महाविद्यालये व विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत असल्याची बाब निदर्शनास आली. या पार्श्वभूमीवर, मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक २१.११.२०१७ बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयास अनुसरून सामाजिक न्याय विभागाने संदर्भ क्र. ६ वर नमूद शासन निर्णय दि. ०८.१२.२०१७ रोजी निर्गमित केला आहे. सदर निर्णयानुसार या विभागाच्या शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क इत्यादिबाबतच्या योजनांबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब विचाराधीन होती. याबाबत पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे :-

शासन निर्णय :

केंद्र व राज्यपुरस्कृत विविध शिष्यवृत्ती, शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क प्रदाने इ.सर्व या विभागांच्या योजनांअंतर्गतसन २०१०-११ ते २०१६-१७ या शैक्षणिक वर्षातील माहे मार्च, २०१७ अखेर पर्यंत प्रलंबित असलेली शैक्षणिक संस्था / महाविद्यालये यांची शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क, परिक्षा शुल्क इ. प्रदानांपोटी (विशेष चौकशी पथकाने कारवाईची शिफारस केलेल्या दोषी संस्था व अनुज्ञेय नसलेले अभ्यासक्रम वगळून) अनुज्ञेय होणाऱ्या रक्कमेपैकी ६० टक्के इतकी रक्कम संबंधित शैक्षणिक संस्था/महाविद्यालयांना तदर्थ तत्त्वावर अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. यासाठी सदर तदर्थ अनुदानाचे अंतिम देयकाच्या प्रदानावेळी समायोजन करणे बंधनकारक राहील. तसेच, सदर कालावधीतील विद्यार्थ्यांना देय असलेल्या निर्वाह भत्त्याची रक्कम त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यावर अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यासाठी संबंधित विद्यार्थी व महाविद्यालयाकडून विहीत बंधपत्र (इन्डेम्निटी बॉन्ड) घेण्याच्या अटीसह संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांनी अटी व शर्ती विहीत कराव्यात.

(१) या प्रयोजनासाठी माहे मार्च, २०१७ अखेर पर्यंतच्या सदरील प्रलंबित देयकाची रक्कम अदा करण्यासाठी विभागांच्या योजनानिहाय मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीच्या १०० टक्के इतकी तरतूद वित्त विभागामार्फत उपलब्ध करुन देण्यास मा.मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(२)विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाकडील माहे मार्च, २०१७ अखेर पर्यंतचे प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी आदिवासी विकास विभागाने ज्या यंत्रणेकडून व ज्या अटी शर्तीवर सदर प्रणाली कार्यान्वित केली आहे, त्या धर्तीवर महाईस्कॉलची प्रणाली कार्यान्वित करुन त्यावरील प्रलंबित अर्ज निकाली काढण्यास अथवा त्यासाठी अल्प निविदा सूचना प्रसिध्द करण्यास व त्यामाध्यमातुन महा-ईस्कॉलची प्रणाली कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(३)सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील पहिल्या सहामाहीसाठी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्काची ५० टक्के इतकी रक्कम विद्यार्थ्यांला देय ठरते, त्याच्या ६० टक्के इतकी रक्कम संबंधित महाविद्यालयांना (विशेष चौकशी पथकाने कारवाईची शिफारस केलेल्या दोषी संस्था

व अनुज्ञेय नसलेले अभ्यासक्रम वगळून) प्रदानांपोटी अदा करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न बॅन्क खात्यावर जमा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बॅन्क खात्यावर जमा होणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या रक्कमेपैकी महाविद्यालयास देय असणारी रक्कम महाविद्यालयाच्या खात्यात जमा होणे आवश्यक असल्याने, त्यासाठी बँकांच्या सल्ल्याने प्रणाली विहीत करावी. तसेच पहिल्या सहामाहीसाठीची विद्यार्थ्यांना देय असलेल्या निर्वाह भत्त्याची रक्कम विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्नित बॅन्क खात्यावर जमा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यासाठी विद्यार्थी व महाविद्यालयांकडुन विहीत बंधपत्र (इन्डेम्निटी बॉन्ड) घेण्याच्या अटीसह संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांनी अटी शर्ती विहीत करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

(४)सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता महा-डिबीटी प्रणालीवरील या विभागाच्या सोबतच्या परिशिष्ट “अ” मधील योजना महाडिबीटी प्रणालीतुन वगळण्यास व त्याची अंमलबजावणी ऑफलाईन पध्दतीने करुन आधार संलग्नित बॅन्क खात्यावर लाभ अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांनी आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी.

(५) महाडिबीटी प्रणालीवरील सर्व त्रुटींचे निराकरण करुन सदर प्रणाली अंतिम टप्प्यापर्यंत कार्यन्वित करण्याची कार्यवाही एक महिन्यात पूर्ण करण्याची कार्यवाही माहिती व तंत्रज्ञान विभागाने करावी.

(६) विमुक्त जाती - भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाच्या कोणत्याही विद्यार्थ्यांनकडून महाविद्यालयांनी त्यांना शासनाकडून अनुज्ञेय असलेल्या शुल्काची मागणी करण्यात येऊ नये अन्यथा अशा महाविद्यालयांविरुध्द कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

२. वरील प्रमाणे संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांनी मा.मंत्रिमंडळाच्या निर्णयाप्रमाणे आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी.

३. सदर योजनांची ऑफलाईन पद्धतीने अंमलबजावनी करताना शासनाच्या या बाबातच्या प्रचलीत नियम तसेच शासन निर्णयाचा भंग होणार नाही याची दक्षता संबंधीत, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, तसेच जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी घ्यावी. ऑफलाईन पद्धतीने अंमलबजावणी करताना काही अनियमितता अथवा त्रूटी आढळून आल्यास याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबधीत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण तसेच संबंधीत जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांची राहिल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१७१२१५१७०३५७३२२२ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2017.12.15 17:07:12 +05'30'

(भा. र. गावीत)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.मंत्री/मा.राज्यमंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई
५) मा.विधान परिषद/विधानसभा सदस्य, विधानभवन, मुंबई
६) मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
७) अमुस/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
९) आयुक्त,समाजकल्याण,महाराष्ट्र राज्य,पुणे.
१०) संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे
११) संचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२) सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
१३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१४) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, पुणे
१५) सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
१६) सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक/उच्च माध्यमिक)
१७) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेय/लेखा परिक्षा) महाराष्ट्र ½,मुंबई/नागपूर.
१८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२०) सर्व सहायक आयुक्त,समाजकल्याण.
२१) निवडनस्ती (का.शिक्षण)

"परिशिष्ट "अ"

(शासन निर्णय, क्र.इबीसी-२०१७/प्र.क्र.७३/शिक्षण, दि. १५ डिसेंबर २०१७ चे सहपत्र)

सन २०१७-१८ करीता महाडिबीटी पोर्टलवरुन वगळून ऑफलाईन पध्दतीने राबवावयाच्या योजना

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग	
अ.क्र	**योजनांची नावे**
१	राज्य सरकारच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती (विजाभज)
२	केंद्र पुरस्कृत योजना इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्या
३	इतर मागावर्गीय विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्या
४	विशेष मागास प्रवर्ग विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्या
५	शिक्षण फी व परीक्षा फी प्रदाने (विजाभज)
६	राज्यातील इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिक्षण फी व परीक्षा फी प्रदाने
७	(०५) (०२) सैनिक शाळेत प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता
८	सैनिक शाळेत प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता
९	व्यावसायिक पाठ्यक्रमाशी संलग्न केलेल्या वसतिगृहातील विमुक्त जाती, भटक्या जमातीतील विद्यर्थ्यांना निर्वाह भत्ता देणे
१०	इयत्ता १० वी च्या परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवून इयत्ता ११ वी मध्ये प्रवेश घेतलेल्या तसेच इयत्ता १२ मध्ये शिक्षण घेत असलेल्या विजाभज व विमाप्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती
११	इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या विजाभज व विशेष मागास प्रवर्गाच्या मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना
१२	इयत्ता ५ वी ते ७ वी इयत्तेत शिकणाऱ्या विजाभज व विमाप्र प्रवर्गाच्या मुलींना सावित्रीबाई मुले शिष्यवृत्ती योजना

****